लोकमत
शुक्रवार ०२.०९.२०२२



हळबे महाविद्यालयातील कार्यक्रमावेळी उपस्थित राजबाली कचरे, प्रद्युम्न आढाव, अक्षय शिंदे, जानवेकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत आदी उपस्थित होते.

# दोडामार्ग महाविद्यालयात स्टार्टअप यात्रा कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी मार्फत प्रशिक्षण शिबिर व स्टार्टअप यात्रा मार्गदर्शन कार्यक्रम झाला.

दोडामार्ग राज्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शासनामार्फत स्टार्टअप यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सोसायटीचे राजबाली कचरे, प्रद्युम्न आढाव, अक्षय शिंदे यांसह आयटीआय दोडामार्गचे जानवेकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यात्रा तीन टप्प्यात होणार असून पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रत्येक तालुक्यात लोक समूह एकत्र येणाऱ्या ठिकाणी फिरत्या मोबाईल व्हॅनद्वारे प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे.

## उत्तम दहा कल्पनांचे होणार राज्यस्तरीय सादरीकरण

या स्पर्धेत जिल्हास्तरावर सर्वोत्तम कल्पना सादर करणाऱ्यास २५ हजार पर्यंतचे पारितोषिक दिले जाणार आहे. तिसऱ्या व अंतिम टप्प्यात प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण होणार आहे. त्यापैकी १४ विजेत्यांना प्रत्येकी एक लाख रुपये पर्यंतचे रोख अनुदान व अन्य पाठबळ मिळणार आहे. यावेळी आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनेसह स्टार्टअप यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन सोसायटी मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोपान जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. दिलीप बर्वे यांनी केले.